REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# डॉ. बाबसाहेब आंबेडकर आणि लोकशाही

प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद.

**प्रास्ताविक :-**



भारतीय संविधानाचे शिल्पकार, मानवी स्वातंत्र्याचे कैवारी, थोर समाजसुधारक आणि अभ्यासक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संबोधले जाते. एका विशिष्ट ध्येयाच्या पाठपुराव्यात आयुष्य खर्ची घालणाऱ्या कृतीप्रवण व कृतीप्रधान व्यक्तीच्या स्वरूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय इतिहासात आपल्या व्यक्तिमत्वाचा जो ठसा उमटविला त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. युगानुयुगे या समाजाच्या तळाशी सडत पडलेल्या अस्पृश्यांचे मन्वंतर घडवून आणणे हा त्यांच्या प्रत्येक विचाराचा व कार्याचा कणा होता. आंबेडकर विचाराचे अभ्यासक डॉ. वा. ना. कुबेर यांनी 'आंबेडकर विचारमंथन' या ग्रंथात आंबेडकरांचा उल्लेख 'दुर्लक्षित मानवतेचा प्रवक्ता' या शब्दात केला आहे. सनातन रूढींच्या कचाट्यातून भारतीयांचे मन मुक्त करणे, येथील सामाजिक संबंधाची मानवी मुल्यांच्या आधारे पुनरूभारणी करणे, कोणत्याही रूढी व प्रथेचे चांगले-वाईटपण मानव कल्याणाच्या परिमाणाधारे जोखून घेणे, प्रत्येक गोष्ट बुध्दीप्रामाण्य व प्रत्यक्षवादावर तपासून घेणे, मानवी प्रतिष्ठेवर अढळ निष्ठा ठेवून मानव कल्याण हेच एकमेव साध्य समोर ठेवणे, मानवाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक समस्यांची उकल शोधणे या बाबासाहेबांच्या राजकीय विचाराच्या प्रमुख प्रेरणा होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर पाश्चात्य उदारमतवादाचा प्रभाव पडला होता. आंबेडकरांच्या विचारांना मानवतावादी तत्वज्ञानाची जोड मिळाली आहे. ते अस्पृश्य दलित जातीतून उदयाला आलेले नेते होते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक व पर्यायाने राजकीय अन्यायाच्या जोखडातून दलित जाती व वर्गाची मुक्ती कशी करता येईल? या प्रश्नाचा त्यांच्या राजकीय तत्वज्ञानावर प्रभाव पडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कट्टर लोकशाहीवादी विचारवंत होते. त्यांचे शिक्षण हे इंग्लंड, अमेरिकासारख्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी देशात झाल्यामुळे त्यांची लोकशाहीवरील निष्ठा बळकट होती. त्यांनी त्यांच्या राजकीय तत्वज्ञानामध्ये लोकशाही व राज्य समाजवादाचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संबंधी विचार :-**

आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शवादी स्वप्नरंजन नव्हते, तर त्याला सभोवतालच्या सामाजिक राजकीय वास्तवाची जोड दिसून येते. तात्विक व व्यव्हारिक विचारांचा संगम करून बाबासाहेब लोकशाहीचा पुरस्कार करतात. सामाजिक समता, न्याय प्रस्थापित करण्यासाठी व जाती व्यसस्थेचे निर्मुलन करण्यासाठी लोकशाही मार्गच योग्य आहे असे त्यांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे, कि ज्याद्वारे रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणले जातात.' या शब्दात लोकशाहीचा अर्थ सांगतात. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नसून ती एक जीवनप्रणाली आहे. समता व समान मावन प्रतिष्ठा हेच लोकशाहीचे अधिष्ठान असते. लोकशाही म्हणजे सहजीवन. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधातच आढळतात. अशी त्यांची लोकशाहीसंबधीची धारणा होती.

लोकशाहीचे अस्तित्व शासन प्रकारावर अवलंबून नसून सामाजिक आर्थिक संबंधावर अवलंबून असते. 'भारतीय लोकशाहीत सहिष्णुतेचा अभाव व प्रबळ जाती व्यवस्था असल्याने येथे सामाजिक-राजकीय सहजीवनाची भावनाच अपुरी दिसून येते.

त्यामुळे अशा समाजात लोकशाही वातावरण निर्माण होणे अवघड असते.' हा विचार आंबेडकरांच्या लोकशाहीवरील चिंतनाचा केंद्रबिंदू दिसून येतो. 'भारतात जिथे सर्वांना समान हितसंबंध नाहीत, परिपूर्ण व मुक्त क्रियाप्रतिक्रियाचे स्वातंत्र्य नाही आणि विभिन्न सामाजिक गटांना सहभागासाठी समान संधीची क्षेत्रे नाहीत, तिथे लहान वा मोठा कोणताही गट अन्य गटांचे प्रतिनिधित्व करूच शकत नाही.' दारिद्र्य, निरक्षरता व जातीय पृथगात्मता हे भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील प्रमुख अडथळे असून जोपर्यंत या तिघांचे निर्मुलन होत नाही तोपर्यंत या देशात लोकशाही अस्तित्वात येवू शकत नाही असे त्यांचे भारतीय लोकशाहीसंबंधी मत होते. यासाठी त्यांनी शासनसंस्थेपुरतीच लोकशाही मर्यादित न करता सर्वच सामाजिक संस्थांचे लोकशाहीकरण करावे असा विचार मांडला. व्यक्तीच्या व्यक्तिगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापणेसाठी लोकशाही हाच एकमेव जीवनमार्ग आहे हे त्यांना मान्य होते. जुलूम, जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्त करणारी शासन व्यवस्था म्हणून ते लोकशाहीकडे पाहत होते. या देशातील सामाजिक संबंधांची फेररचना फक्त लोकशाही राजवटच करू शकेल असा त्यांना विश्वास होता.

### भारतीय परिस्थितीत लोकशाहीची प्रस्तुतता :-

लोकशाही शासनप्रकार लोकशाही समाजरचना गृहीत धरीत असतो. सामाजिक लोकशाही अस्तित्वात आल्याखेरीज राजकीय लोकाशाहीला अर्थ प्राप्त होत नाही. भारतातील सामाजिक व आर्थिक विषमता लोकशाहीला पोषक नाही असे आंबेडकरांचे मत होते. जेथे संपूर्ण समाज जातिबध्द असून माणसांच्या निष्ठा आणि हितसंबंधांना जातीय मर्यादा आहेत तेथे कोणतेही लोकशाही शासन हे जातीय किंवा सांप्रदायिक बहुसंख्याकांचे राज्य बनणार हे उघडच आहे. अशा प्रकारचे बहुमत हे समाजातील सर्व संबंधाचे प्रतिनिधित्व कधीच करू शकत नाही. शासनकर्ते नेहमीच विशिष्ट अशा राज्यकर्त्या वर्गातून येतात. ज्या वर्गावर राज्य केले जाते त्यास शासक होण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे संसदीय लोकशाही म्हणजे लोकांनी चालविलेले शासन असे त्याचे स्वरूप न राहता वंशपरंपरेने येणाऱ्या शासनकर्त्यांकडून वंशपरंपरा असणाऱ्या शासितांच्या वर्गावर चालविले जाणारे शासन, असे स्वरूप त्यास प्राप्त झालेले दिसून येते. या अशा प्रकारच्या तिरस्करणीय समाजरचनेपायी संसदीय लोकशाहीस नैराश्यजनक अपयश अनुभवावे लागते. म्हणूनच संसदीय लोकशाही सामान्यांचे स्वातंत्र्य, संपत्ती व सुखाच्या शोधाची अपेक्षापूर्ती करू शकत नाही. भारतामध्ये ही शासनपध्दती यशस्वी होण्यासाठी येथे ज्ञानप्रसार होणे, लोक जागृती होणे, समाजातील कनिष्ट घटकांचे उत्थान होणे, तसेच त्यांना मूलभूत मानवी हक्कांची हमी मिळणे आवश्यक आहे. अमर्याद स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी लोकशाही आर्थिक अन्यायासाठी साधनीभूत ठरण्याचा धोका संभवतो. गुंतलेल्या हितसंबंधांना प्राधान्य देऊन गरीबांची व दलितांची उपेक्षा करण्याची चूक अशा लोकशाहीच्या हातून घडू शकते. त्यामुळेच लोकशाहीचा सामाजिक व आर्थिक आशयही महत्वपूर्ण आहे. कोणत्याही लोकशाही देशाने आर्थिक सुधारणेच्या आधारे सामाजिक व राजकीय समता घडवून आणावी. सर्वांना उत्पन्नाची साधने निर्माण करून देवून जनतेचा सर्वांगिण विकास घडवून आणावा असे आंबेडकरांची भारतीय लोकशाही संबंधी धारणा होती.

### लोकशाही शासनाचे स्वरूप आणि कार्यक्षेत्र :-

आंबेडकरांच्या मते भारतामध्ये शासनाचे स्वरूप हे संघराज्यात्मक आणि संसदीय असणे गरजेचे आहे. कारण यात अनुवंशिक राज्यकर्त्यांना मुळीच स्थान नाही. लोकांच्या प्रतिनिधींची मान्यता असल्याखेरीज कोणत्याच कायद्याची अंमलबजावणी होवू नये. शासनाने बळाचा वापर औषधाप्रमाणे करावा दैनिक आहाराप्रमाणे करू नये. शासन हे स्वंयशासनाबरोबरच सुशासन असावे. शासनाने नि:पक्षपातीपणा, न्यायबुध्दी, स्वच्छ प्रशासन व लोकांच्या सुखसोयीची व्यवस्था करून त्यांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक विकास साधावा. आंबेडकर राज्यसंस्था व शासनयंत्रणेकडे एक साधन या दृष्टीने पाहतात. व्यक्ती आणि समष्टी यांच्या संबंधातील समतोल राखण्याचे कार्य ते राज्यसत्तेवर सोपवतात. बाह्य आक्रमण व अंतर्गत यादवी यांपासून व्यक्तींचे संरक्षण करुन कायदा व सुव्यवस्था टिकविणे हे त्यांच्या मते शासनसंस्थेचे प्राथमिक कर्तव्य आहे. शासनाने उत्तम सामाजिक जीवनाच्या दृष्टीने मानवाची व समाजाची सेवा करावी, मानवी सौख्य व सुरक्षितता यात भर घालावी. त्याचबरोबर समाजातील एक गट दुसऱ्या गटाची पिळवणूक करीत नाही वा त्याला त्याच्या हक्कांपासून वंचित करीत नाही हे पाहण्याची जबाबदारी ते शासनावर सोपवतात. बहुमताच्या हुकूमशाहीपासून अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी सविस्तर नियंत्रण आणि समतोलाची योजना त्यांनी मांडली आहे. त्यासाठी सत्ताविभाजनाच्या सिध्दांतावरच ते विशेष भर देतात.

शासनाच्या कार्याचे संक्षिप्त विवरण आंबेडकरांनी खालीलप्रमाणे केले आहे.

१. प्रत्येक प्रजाजनाचा जगण्याचा, स्वातंत्र्याचा, सुखशोधनाचा, मुक्त अविष्करणाचा व धर्मोपासनेचा हक्क अबाधित ठेवणे.

२. पददलित वर्गांना विशेष संधी देऊन सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विषमता नाहीशी करणे.

३. टंचाई व भय यांपासून मुक्त अशा स्वातंत्र्याचा उपभोग प्रत्येक प्रजाजनाला शक्य करून देणे.

यावरून हे स्पष्ट होते की आंबेडकरांच्या विचारविश्वातील राज्यसत्ता ही केवळ पोलिसी राज्यसत्ता नसून तिला महत्वाचा असा सामाजिक संदर्भ व सामाजिक उत्तरदायित्व आहे. ती खऱ्याखुऱ्या समतेवर आधारलेली सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण करणे हे तिचे कार्य आहे.

## मानवी हक्कांचे संरक्षण :-

भारतीय समाजात परंपरेने व्यक्तीला जे समाजाच्या तुलनेत दुय्यम स्थान दिले आहे ते आंबेडकरांना अमान्य होते. व्यक्तीला व्यक्ती म्हणून दर्जा प्राप्त न होता समाजाचा वा जातीचा एक घटक एवढेच गौण स्थान दिले जाणे त्यांना व्यक्तीप्रतिष्ठेला मारक वाटते. येथे राज्यसत्तेनेही व्यक्तीला पूर्वापार गौण स्थान दिले होते. व्यक्तीस्वातंत्र्याचा येथे अभावच होता आणि जे काही अल्पस्वल्प व्यक्तिस्वातंत्र्य होते ते फक्त उच्चवर्णीयांनाच होते. आंबेडकरांनी सर्व नागरिकांच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा जोरकस पुरस्कार केला होता आणि ते स्वातंत्र्य केवळ राजकीय नाही तर त्यात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि बौध्दिक स्वातंत्र्याची राज्याने व्यक्तीला हमी दिली पाहिजे असे त्यांना अभिप्रेत होते. आंबेडकरांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणांनाही महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या मते, राजकीय लोकशाहीची उभारणी ही पुढील चार गृहीतकांवर झालेली आहे.

१) व्यक्ती ही स्वंयमेव साध्य आहे.
२) व्यक्तीला कांही अदेय हक्क असतात व घटनेने त्या हक्कांची हमी त्याला दिलीच पाहिजे.
३) कोणत्याही विशेषाधिकाराच्या प्राप्त्यार्थ व्यक्तीला आपल्या घटनादत्त हक्काचा त्याग करावा लागू नये.
४) इतरांवर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्था कोणाही खाजगी व्यक्तींना प्रदान करणार नाही.

या अधिकरांचा लाभ समाजातील अधिकाधिक लोकांना प्राप्त होणे हा आंबेडकरांच्या मते लोकशाहीचा सर्वश्रेष्ठ निकष आहे. सर्व नागरिकांना सर्वच क्षेत्रांमध्ये समान संधी द्यावी. सर्वांच्या मागण्या व हितसंबंधामध्ये एक प्रकारचा सुसंवाद निर्माण झाला पाहिजे. अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांना संरक्षण देण्याचे सौजन्य बहुसंख्यांकाजवळ असावे आणि मानवी हक्कांच्या संदर्भात माणसांमाणसामध्ये कसल्याही प्रकारचा भेदभाव केला जावू नये.

## लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता व बंधुता :-

आंबेडकरांच्या मते आपल्या देशात राजकीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी सामाजिक लोकशाही निर्माण होणे आवश्यक आहे. सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांना जीवनाचे सिध्दांत म्हणून मान्य करणारी जीवनप्रणाली होय. संसदीय लोकशाहीच्या पराभवाला कारणीभूत ठरणाऱ्या कारणांची मिमांसा करताना त्यांनी स्वातंत्र्याच्या कल्पनेला ठपका ठेवला आहे. ते म्हणतात, 'संसदीय लोकशाहीने आर्थिक विषमतेकडे कधी लक्ष दिले नाही. याचा परिणाम असा झाला की स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या या लोकशाहीने गरीब, दलित आणि नागवलेल्यांच्या विपन्नतेत अधिकाधिक भर घातली.' संसदीय लोकशाहीच्या दुसऱ्या दोषावर बोट ठेवताना डॉ. आंबेडकर म्हणतात,'संसदीय लोकशाहीला विकृत रूप देणारी दुसरी चूकीची धारणा म्हणजे जेथे आर्थिक व सामाजिक लोकशाहीला केवळ नावापुरते व नाटकी रूप प्राप्त करून दिले.' स्वसामर्थ्यावर ध्येयसिध्दीला जेथे संधी आहे तेच स्वातंत्र्य होय. केवळ व्यक्ती नव्हे तर समूह मिळून समाज घडतो. व्यक्तीला स्वातंत्र्य असावे परंतु व्यक्तीविकास हे सामाजिक समतेत अंतर्भूत असले पाहिजे. सर्वच बाबतीत समता असा दुराग्रह शक्य नाही. निसर्गदत्त विषमता आपल्या ठिकाणी आहे. ती शारीरिक वा भौतिक असेल. मनुष्यनिर्मित विषमता त्यांना कदापिही मान्य नाही. सामाजिक वातावरण व संधीबाबत समता अपरिहार्य आहे. ते म्हणतात, 'माझ्या तत्वज्ञानात बंधुतेला फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य नि समता यांच्याविरूध्द संरक्षण फक्त बंधुभावनेतच शक्य आहे.' गतिमानता, परस्पर संवाद, सहकार्य व सहजीवन, समकेंद्री समाजरचना ही बंधुभावाची लक्षणे होत. बंधुभाव हे लोकशाहीचे दुसरे नाव आहे. सभोवतालच्या माणसांबद्दल आदराची भावना म्हणजे 'बंधुभाव' किंवा 'मैत्रभाव' होय. अशा या लोकशाहीच्या प्रेमापोटी बाबासाहेबांनी भांडवलशाही, ब्राम्हणशाही व हुकूमशाहीचा आमरण विरोध केला.(संदर्भ :- लेख, डॉ. भाऊ लोखंडे, दैनिक लोकमत, दि. २६/११/२००९)

## कायदा व घटनात्मक नितीमत्ता :-

कायद्याला लोकशाहीत अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कायद्याचे अधिराज्य ही संकल्पना आंबेडकरांच्या लोकशाही विचाराचा केंद्रबिंदू मानावा लागेल. लोकशाहीतील कायदा सर्वांसाठी समान, हितकर व मानवी असायलाच पाहिजे. तो लोकमताला प्रतिबिंबित करणारा असावा. तो मन:पूत व जुलमी असू नये. कायदा मानवनिर्मित असल्यामुळे परिस्थितीसापेक्ष परिवर्तनीयता त्याच्या अंगी असावी. आंबेडकर कायद्यापेक्षा घटनात्मक नितीमत्तेला अधिक महत्व देतात. राज्यकृत कायद्याद्वारे सगळे प्रश्न सुटू शकत नाहीत. मानवी कार्यक्षेत्र इतके व्यापक, गुंतागुंतीचे व चिरपरिवर्तनीय आहे की राज्याचा कायदा त्याचे कार्यक्षमपणे नियमन कधीच करू शकत नाही. बहुसंख्य मानवमात्रावर राज्याच्या कायद्यापेक्षा नैतिक कायद्याचेच अधिक नियंत्रण असते. सर्वश्रेष्ठ विधितज्ञापेक्षा जनसामान्यांची संकलित बुध्दीमत्ता अधिक वरच्या दर्जाची असून नैतिक कायदा या बुध्दिमत्तेने निर्माण केलेला असतो. म्हणूनच तो श्रेष्ठतर असतो. घटनात्मक पायंडेच अधिक समर्थपणे परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालू शकतात. कायद्याला नेहमीच हे साधेल असे नाही. आंबेडकरांच्या मते भारतात ही घटनात्मक नितीमत्ता पुरेशी अंगवळणी पडलेली नाही. येथे तिचे प्रयत्नपूर्वक संगोपन होणे गरजेचे आहे. सार्वजनिक शिक्षण, जननिष्ठा व सचोटी यांच्याद्वारे हे घडून येवू

शकते, अशी त्यांची खात्री होती. लोकांची सदसद्‌विवेकबुध्दी हा लोकशाहीचा सर्वात मोठा आधार असतो. उघड्या डोळ्यांनी दिसणाऱ्या प्रत्येक अन्यायाविरूध्द, अयोग्य वर्तनाविरूध्द सदसद्‌विवेकबुध्दीची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाली तरच खऱ्या अर्थाने या देशात लोकशाही यशस्वी होईल असे त्यांना वाटे.

### सर्वांना समान मानवी प्रतिष्ठा :-

सामाजिक दृष्टीने भारतीय समाज हा श्रेणीयुक्त विषमतेच्या सिध्दांतावर आधारलेला आहे. हा समाज एखाद्या उतरंडीसारखा असून यात कांहीची उन्नती आणि बाकीच्यांची अधोगती अशी आवस्था आहे. आर्थिक दृष्टीने आपला समाज असा आहे की ज्यात काहींजवळ अलोट संपत्ती तर बहुसंख्यांक घोर दारिद्र्यात राहतात. आंबेडकर म्हणाले होते, "२६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंगतीच्या जीवनात प्रवेश करीत आहोत. राजकारणात आपल्यजवळ समता असेल तर आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता. राजकारणात आपण एक व्यक्ती एक मत आणि एक मत एक मूल्य या सिध्दांताला मान्यता देत राहू, पण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात आपल्या सामाजिक-आर्थिक रचनेमुळे एक व्यक्ती एक मूल्य या तत्वास आपण नाकारत राहिलो तर आपल्या राजकीय लोकशाहीचे नष्टचर्य ओढवेल. शक्य असेल त्या क्षणी आपण ही विसंगती दूर केली पाहिजे." निसर्गाने माणसांमध्ये विषमता पेरली असली तरी ही बाब लोकशाहीच्या विकासाआड येऊ शकत नाही. किंबहुना माणसे निसर्गतः विषम असतात म्हणूनच त्यांना समतेची वर्तणूक देणे आगत्याचे आहे. केवळ एका व्यक्तीला एक मत देऊन सामाजिक लोकशाही निर्माण होत नाही. सामाजिक लोकशाहीत दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. 'पहिली, सहबांधवांबद्दल समनस्कता, सन्मान आणि समभाव आणि दुसरी, ताठर अशा सामाजिक बंधनांपासून मुक्त अशी सामाजिक रचना. समाजातील कांही लोकांना विशेषाधिकार असणे व काहींना ते नसणे यामधून समाजातील काही वर्ग एकाकी व तुटून पडणे हे लोकशाहीशी विसंगत आहे.' 'एक व्यक्ती एक मत' यापेक्षा आंबेडकरांना 'एक व्यक्ती एक मूल्य' हे तत्व अधिक योग्य वाटते. सामाजिक व राजकीय संबंधांमध्ये व्यक्तीच्या व्यक्तीमत्वातील अंगभूत मूल्य या तत्वाच्या मुळाशी आहे. यामध्ये त्यांना जनतेच्या सर्वांगीण आर्थिक, सामाजिक विकासाचे रहस्य आढळते. पाच वर्षांनी एकदा दिले जाणारे मत उपाशी पोटी माणसाला कवडी किंमतीचे वाटणे अगदीच स्वाभाविक आहे. शोषण, दमदाटी व छळ सदैव ज्याच्या वाट्याला येतात त्याला त्या मताचे काहीच महत्व वाटणार नाही. ज्याला कधीच कुणाकडून सहानुभूती, प्रेम वा जीवनहेतूंचे आदान-प्रदान लाभत नाही त्याचे समाधान हे मत करू शकणार नाही. म्हणून त्यांच्या मते या परिस्थितीमध्ये आधी परिवर्तन घडवून आणले तरच या देशात यशस्वी लोकशाही उभी राहील असे त्यांना वाटे.

### राजकारणात व्यक्तीनिष्ठा आणि व्यक्तीपूजेचा त्याग :-

आंबेडकरांच्या मते व्यक्तीनिष्ठा आणि व्यक्तीपूजा या बाबी लोकशाहीस मारक ठरतात. अतिरेकी व्यक्तीनिष्ठेतून लोकशाहीचा लोप होऊन हुकूमशाहीचा मार्ग प्रशस्त होतो. यामुळे व्यक्तीला परावलंबित्वाची सवय लागून कर्तव्याबाबतीत पूर्णतः उदासिनता येते. अशावेळी व्यक्तीला राजकीय जीवनात लाकडी ठोकळ्यापेक्षा जास्त स्थान राहत नाही. भारतीय लोक परंपरेने बुध्दीपेक्षा श्रध्देवर विश्वास ठेवणारे आहेत. त्यामुळे ते आंधळे, परावलंबी बनतात. येथे सर्वसामान्यांपेक्षा काही तरी वेगळे करणारा मनुष्य जो इतर ठिकाणी चमत्कारिक अथवा वेडगळ गणला असता तो येथे 'माहात्मा' अगर 'योगी' म्हणून गणला जातो व मेंढ्यांनी जसे मेंढपाळाच्या मागे जावे तसे लोक त्याच्या मागे जातात. माझी ही खात्री आहे की, हेच जर असेच चालू राहिले तर आपण संपादन केलेल्या राजकीय प्रगतीचे फायदे आपला देश कधीच मिळवू शकणार नाही. म्हणूनच भक्ती ही आध्यात्मात आत्म्याच्या मुक्ततेची वाट दाखवीत असली तरी राजकारणात ती अधःपतनाची व शेवटी हुकूमशाहीचा मार्ग प्रशस्त करीत असते. ते म्हणतात, "ज्यांनी जीवनभर लोकसेवेस वाहून घेतले आहे, त्यांच्याबद्दल मनामध्ये कृतज्ञता बाळगणे गैर नाही. परंतु त्या कृतज्ञेसही मर्यादा असते. प्रसिध्द आयरिश देशभक्त डॅनियल ओकोनेल म्हणत असे - "कोणताही मनुष्य त्याच्या स्वाभिमानाच्या किमतीच्या मोबदल्यात कृतज्ञ राहू शकत नाही. कोणतीही स्त्री आपल्या शिलाच्या बदल्यात कृतज्ञ राहू शकत नाही व कोणतेही राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याच्या बदल्यात कृतज्ञ राहू शकत नाही." म्हणूनच आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, लोकशाहीने हे शिकले पाहिजे की, एका प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी एकापेक्षा अधिक मते असू शकतील व लोकांनी ती मांडावीत. तसेच ज्यांना कांही योग्य व उपयुक्त सांगावयाचे आहे त्यांना लोकशाहीने आदरपूर्वक मान दिला पाहिजे.

### संसदीय लोकशाही :-

संसदीय लोकशाहीवर आंबेडकरांचा विशेष भर होता. आपल्याला या समाजरचनेत मानाचे स्थान आहे अशी जाणीव हीच शासनपध्दती प्रादुर्भूत करीत असल्यामुळे व्यक्तींच्या मुक्तीचा मार्ग यामधूनच खुला होऊ शकतो. संसदीय शासनपध्दती हीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. यामध्ये सहकार्य, शिस्त व समर्पणादी गुणांचा विकास होऊ शकतो. त्यामुळेच संसदीय शासनपध्दती त्यांना चांगली वाटते. सर्वांना समान मताधिकार देण्यातून या पध्दतीचा प्रारंभ होतो. पण तिथेच ती व्यवस्था थांबत नाही. मताधिकारातून मिळणाऱ्या राजकीय समतेचा प्रवाह आर्थिक व सामाजिक समतेच्या दिशेने वाहत जातो. संसदीय लोकशाहीमध्ये सार्वत्रिक प्रौढ मताधिकारानुसार नियतकालीत, मुक्त व न्याय निवडणूका होऊन शांततापूर्ण मार्गाने सत्तांतर घडून येते. या शासनपध्दतीमध्ये

बहूमताचे सरकार येवून विरोधी पक्षांनाही महत्वपूर्ण स्थान असते. त्यामुळे या प्रकारात व्यक्ती व समाजहिताचा जास्तीत जास्त विचार केला जातो. आंबेडकरांना संसदीय लोकशाही आवडत असली तरीही ते या पध्दतीचे समर्थन करणारे आंधळे भक्त नव्हते.

शिक्षणाचा प्रसार, लोकजागृती आणि सामाजिक व आर्थिक वर्गांचा अभाव या लोकशाहीच्या पूर्व अटी आहेत. भारतात अगदी या विरूध्द परिस्थिती आहे. भारतीय संदर्भात संसदीय लोकशाहीचा विचार करताना आंबेडकरांनी कांही अडथळयांचाही विचार केला आहे. भारतामध्ये जातीव्यवस्था प्रबळ असल्याने लोक राजकीय नैतिकतेपेक्षा जातीलाच अधिक प्राधान्य देतात त्यामुळे येथे निकोप राजकीय बहुमताची घडण होण्याऐवजी एकाच जातीच्या बहुमताचे सातत्य प्रस्थापित होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. राजकीय बहुमत परिवर्तनीय असते, राजकीय पक्षाचे सामर्थ्य व सदस्य संख्या कमी-अधिक होऊ शकते, मात्र जन्माधिष्ठित जाति-समुहाबाबत तसे घडत नाही. राजकीय बहुमताचा कोणीही सभासद आपले योगदान राजकीय कार्यात देण्यास सापेक्षतः स्वतंत्र असतो तर जातीय बहुमतात राजकारणाचा ओघ व्यक्तीच्या जन्माधारे प्रभावित होत जातो. या देशात बहुमताचा अर्थ जातीय व धर्मीय असल्याने बहुसंख्य संप्रदायाचे लोक अल्पसंख्यांक संप्रदायावर सत्ता गाजवतील तसेच अल्पसंख्यांक जातीवर सक्ती व जुलूमही होण्याचा धोका नाकारता येत नाही.

भारतात संसदीय लोकशाहीच्या यशाआड येणारे घटक अनेक आहेत याची आंबेडकरांना जाणीव होती. ही पध्दती परकीय असल्यमुळे अजून तिची मुळे या देशाच्या भूमीत पुरेशी रूजलेली नाहीत. म्हणून कांही दिवस ही पध्दती राबविताना येथील नागरिकांना त्रास होईल. या समाजाचे आधुनिकीकरण आणि लोकशाहीकरण या प्रक्रिया विलक्षण संथ असणे अपरिहार्य आहे. संसदीय लोकशाहीत घडून येणाऱ्या घडामोडी या नेहमीच संथ असतात. प्रसंगी हा संथपणा अत्यंत जीवघेणाही होतो. घिसाडघाईने घडून येणाऱ्या परिवर्तनापेक्षा हे संथ व रचनात्मक परिवर्तन दीर्घकालीन परिणामांच्या दृष्टीने इष्ट म्हटले पाहिजे. म्हणून प्रारंभीच्या अपयशाने व अल्पयशाने खचून न जाता भारतीयांनी धीर धरून संसदीय पध्दती शिकायला, समजावून घ्यायला पाहिजे आणि ती यशस्वी करण्यासाठी परिश्रमाची शिकस्त केली पाहिजे. कारण आंबेडकरांच्या मते, या देशात संसदीय लोकशाहीला चांगला पर्यायच नाही.

## राजकीय पक्षाचे अस्तित्व :-

या देशातील लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संघटीत व शिस्तबध्द राजकीय पक्षांची नितांत आवश्यकता आहे. टीका करण्याचा हक्क हा लोकशाहीतील सर्वात महत्वाचा हक्क आहे. संघटित विरोधी पक्ष अस्तित्वात असल्यखेरीज त्या हक्काला कांही अर्थच उरत नाही. राजकीय पक्षांखेरीज लोकशाहीची कल्पना करणे अशक्य आहे. लोकमताचे अविष्करण व प्रात्यक्षीकरण करणे ही या पक्षांची तत्वतः जबाबदारी असते. त्याचबरोबर प्रत्यक्षात लोकमत तयार करणे हे कामसुध्दा राजकीय पक्ष करीत असतात. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असे दोन पक्ष असल्याखेरीज लोकशाही शासन लोकशाही राहूच शकत नाही. एकंदरीत आंबेडकरांच्या मते द्विपक्ष पध्दती ही आदर्श असावी असे वाटते, पण बहुपक्षपध्दतीला त्यांचा विरोध नव्हता. कारण पक्ष जरी संख्येने अनेक असले तरी सत्ताधारी व विरोधक या दोन गटात त्यांची वर्गवारी होणे अनिवार्य असते. परंतु विरोधासाठी विरोध विरोधाच्या नावाखाली विध्वंस आंबेडकरांना अमान्य होता. सत्ताधारी पक्षानेही संख्याबळाच्या जोरावर विरोधक व अल्पसंख्यांकावर अन्याय करता कामा नये. विरोधक व अल्पसंख्यांक यांची विश्वासार्हता टिकविणे हे लोकशाही यशाचे महत्वाचे गमक त्यांनी मानले आहे. राजकीय पक्षांना सामाजिक उत्तरदायित्व असावे व या पक्षांनी लोकांभिमुख राहून लोकशिक्षणार्थ त्यांनी नागरिकांचे राजकीय सामाजिकरण घडवून आणावे अशी त्यांची राजकीय पक्षांकडून अपेक्षा होती.

## सारांश / समारोप :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचाराची प्रेरणा मानवी प्रतिष्ठा व त्यातही दीनदलितांविषयी त्यांना असणाऱ्या कळवळयात दिसून येते. त्यांच्या प्रत्येक विचारांवर मानवतावादी विचारसरणीची छाप दिसून येते. सामाजिक न्यायावर आधारलेला समाज निर्माण करणे हा त्यांच्या लोकशाही विचाराचा केंद्रबिंदू दिसून येतो. त्यांच्या लोकशाही विचार म्हणजे केवळ राजकीय हक्क व राजकीय लोकशाहीपुरता मर्यादित नसून त्याची ओढ सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्मितीकडे आहे. त्यांना राजकीय लोकशाहीच्या माध्यमातून सामाजिक-आर्थिक क्षेत्रात न्याय, समता, स्वातंत्र्य आणि शोषणमुक्त समाज निर्माण करावयाचा आहे. प्रत्येक व्यक्तीला तिची अंगभूत प्रतिष्ठा व समान मूल्य प्राप्त करून देण्याचा आग्रह आहे. शासनाला कोणताही धर्म असणार नाही. अल्पसंख्यांकांना असुरक्षित वाटणार नाही. घातपाताचे मार्ग वर्ज्य असतील. विभूतीपूजेला फाटा दिलेला असेल. कायद्यापुढे सर्व समान असतील. विरोधी पक्षाला प्राधान्य व मान असेल. संवैधानिक नैतिकतेचे पालन केले जाईल. नितीमान समाजाची आणि विवेकी लोकमताची निर्मिती करण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. अशा प्रकारच्या सर्व वैशिष्ट्यासकट डॉ. आंबेडकर भारतीय लोकशाहीच्या भविष्याची काळजी करतात.

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या विचारात भारतामध्ये लोकशाही यशस्वी होण्यासाठी राज्यकर्ते व सामान्य जनतेला वस्तुनिष्ठ मार्गदर्शन केले आहे. त्यांनी आपल्या लोकशाही विचारातून येथे कालबाह्य झालेल्या सामाजिक आणि आर्थिक संरचना मोडून काढण्याचा वा बदलण्याचा घटनात्मक आणि स्वैच्छिक मार्ग दाखविला आहे. त्यांना समष्टीचे व्यक्तीवरील सार्वभौम श्रेष्ठत्व जसे मान्य नाही त्याचप्रमाणे व्यक्तीचे समष्टीवरील निरंकुश श्रेष्ठत्वसुध्दा मान्य नाही. आंबेडकरांनी आपल्या लोकशाही विचारामध्ये व्यक्ती आणि समष्टी यांच्यात सुसंवाद साधून सर्वांच्या कल्याणाचा समन्वय प्रधान मार्ग स्वीकारला आहे म्हणूनच त्यांच्या लोकशाही विचाराला वास्तवतेची जोड मिळाली आहे.

**संदर्भ सूची :-**

१. डॉ. भा. ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, जून २००३.
२. डॉ. ज. रा. शिंदे, भारतीय राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, जून १९९९.
३. डॉ. ना. य. डोळे, भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जून १९९९.
४. डॉ. वि. मा. बाचल, प्रा. स. म. गोळवलकर, प्रा. र. घ. वराडकर आणि व्हि. एस. क्षीरसागर, अनिरूध्द पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती, २००९.
५. लोकराज्य, (मासिक) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, विविध अंक.